# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स : २२६९२१०२/२२६९०००७.

तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :http/www.dte.org.in


**परिपत्रक** क्र. ४-अ/आस्था/२००९/बदली/१०३४

**कालमर्यादा दि.३१.०१.२००९** दिनांक : १३ जानेवारी, २००९

**प्रति,**

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

३) उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय,
पुणे, औरंगाबाद, नागपूर.

४) प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

**विषय :- शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांबाबत...**

संदर्भ :- शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्याकरीता सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांसदर्भात संदर्भांकित परिपत्रकान्वये शासनाने बदल्यांचे धोरण जाहीर केले असून, बदल्यांच्या धोरणानुसार **दिनांक ३१.०३.२००९** पर्यंत एकाच ठिकाणी किंवा एकाच पदावर ३ वर्ष सेवा पूर्ण करणारे अध्यापक बदलीस पात्र असल्यामुळे संदर्भातील आपल्या तंत्रनिकेतनांतील अध्यापकांची माहिती सोबतच्या विहित प्रपत्रात खालील सुचना विचारात घेऊन सादर करण्यात यावी. दिनांक ३१.०३.२००९ रोजी एकाच ठिकाणी/एकाच पदावर ३ वर्ष सेवा पूर्ण करणा-या शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य / विभाग प्रमुख तत्सम / अधिव्याख्याता यांची माहिती सोबतच्या विहित प्रपत्रात excel sheet मध्ये DV-TTNatraj या फॉन्टमध्ये तयार करुन dte_4a@rediff.com या पत्यावर मेल करावी.

१) बदलीसाठी संबंधितांना वैयक्तीक पसंतीचीा ३-४ ठिकाणे कळविण्याची सूचना देऊन त्याप्रमाणे माहिती सादर करण्यात यावी. मात्र ज्या अध्यापकांनी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे दिली नाहीत त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने इतरत्र करण्यात येईल याची त्यांना जाणीव करुन द्यावी.

२) शासन धोरणानुसार पती-पत्नी दोघे शासन सेवेत असल्यास व त्यांची एकाच ठिकाणी बदली करावयाची असल्यास, संबंधित जेथे कार्यरत आहेत त्या कार्यालयाचे ते कार्यरत असल्याबद्दलचे संबंधित कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र लेखी स्वरुपात पुरावा म्हणून सादर करण्यात यावेत.

*३) आपल्या तंत्रनिकेतनांत/कार्यालयात कार्यरत असलेल्या अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांच्याबाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांचा शैक्षणिक संपादणुक अहवाल प्रतिकुल आहेत अशा अध्यापकांची नांवे सुध्दा कळवुन त्यांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत आपले स्पष्ट अभिप्राय कळविण्यात यावेत.*

४) संदर्भीय शासन परिपत्रकात दिलेल्या सर्व तरतूदी विचारात घेण्यांत येवून त्या अनुषंगाने प्रस्ताव दिल्याचे प्रमाणित करावे.

५) ज्या अध्यापकांना विनंती बदली हवी असल्यास त्यांचे अर्ज नव्याने प्राचार्यांच्या शिफारशीसह एकत्रितपणे सादर करणे आवश्यक राहिल. सदर अर्जात संबंधितांची जन्मतारीख नमुद करणे आवश्यक आहे.

६) जे अध्यापक नजिकच्या कालावधीत सेवानिवृत्त होत आहेत अशा अध्यापकांच्या नांवासमोर ठळक अक्षरात अभिप्राय देणे आवश्यक आहे.

७) जे अध्यापक अपंग आहेत अथवा ज्यांची मुले अपंग आहेत अशा अध्यापकांनी तसा पुरावा प्राचार्यांकडे सादर करावा तसे प्राचार्यांनी अभिप्रायामध्ये नमुद करावे.

८) ज्या अध्यापकांनी आई वडिलांचे, मुलांचे, पत्नीचे आजारपणासाठी बदलीची विनंती केली असेल अशा अध्यापकांना वैद्यकीय कागदपत्रे पुरावा म्हणून देणे आवश्यक आहे.

*९) जे अध्यापक बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल ही बाब आपल्या संस्थेतील अध्यापकांच्या निदर्शनास आणावी*

१०) विनंती बदली करीता असलेले अंर्ज प्राचार्य/ विभागीय कार्यालय यांचे मार्फतच सादर करावेत. थेट सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही याची संबंधितांना जाणीव करुन द्यावी.

तरी, आपणांस कळविण्यात येते की, आपल्या तंत्रनिकेतनांत/कार्यालयात दिनांक ३१.०३.२००९ रोजी एकाच ठिकाणी/एकाच पदावर ३ वर्ष सेवा पूर्ण करणा-या अध्यापकांची माहिती सोबतच्या विहित प्रपत्रात भरुन या कार्यालयास दिनांक ३१.०१.२००९ पूर्वी निश्चितपणे पाठविण्यात यावी. तसेच संस्थेत दिनांक ३१.०१.२००९ पर्यत मंजूर, रिक्त व भरलेली पदे तसेच भरलेल्या पदावर कोणते अध्यापक कार्यरत आहेत त्या अध्यापकांची माहिती सोबतच्या विवरणपत्र क मध्ये सादर करावी. जे अधिव्याख्याते न्यायालयीन आदेशानुसार तसेच कंत्राटी, ऑनलाईन पध्दतीने कार्यरत आहेत त्यांची नांवे ठळक रित्या दर्शविण्यात यावी. सदरची माहिती अचूक असणे आवश्यक आहे. जर सदरची माहिती चूकीची आढळल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदरचे परिपत्रक या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ सु का महाजन)
**प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई**

F:\Lecturer tran circular 2008.doc

## शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य पदावर कार्यरत अधिका-यांच्या सन २००९-२०१० नियतकालिक बदल्यांची माहिती

| अक्र | अधिका-याचे नाव | नियुक्तीचा दिनांक व एकूण सेवा | सेवानिवृत्तीचा दिनांक व उर्वरीत सेवेचा कालावधी | सध्या कार्यरत संस्थेचे नाव व कालावधी | यापूर्वी विविध संस्थेत केलेल्या सेवेचा तपशिल | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|

## शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य पदावर कार्यरत बदलीपात्र अधिका-यांची माहिती

| अ क्र | अधिका-याचे नाव | संस्थेचे नाव | संस्थेत कार्यरत पदावरील कालावधी | बदलीचे निश्चित कारण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|

# प्रपत्र अ

शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य / विभाग प्रमुख व तत्सम / अधिव्याख्याता व तत्सम  पदावर कार्यरत अधिका-यांची विनंती बदली माहिती

| अक्र | अधिका-याचे नाव | पदनाम | संस्थेचे नाव | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सदर तंत्रनिकेतनात कोणत्या दिनांकापासून कार्यरत आहेत तो दिनांक | विनंती बदलीचे कारण | विनंती बदलीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

उपरोक्त माहिती प्राचार्य, विभाग प्रमुख व अधिव्याख्याता यांची वेगवेगळया प्रपत्रात द्यावी

# प्रपत्र ब

शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य / विभाग प्रमुख व तत्सम / अधिव्याख्याता व तत्सम पदावर कार्यरत असलेल्या बदलीपात्र अध्यापकांची माहिती दर्शविणारे प्रपत्र

| अक्र | अधिका-याचे नाव | पदनाम | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सदर संस्थेत कोणत्या दिनांकापासून कार्यरत आहेत तो दिनांक | बदलीसाठी वैयक्तीक पसंतीची ठिकाणे | दिनांक २७.११.१९९७ च्या शासन परिपत्रकातील सुचनानुसार बदलीस पात्र अध्यापकांची बदली करण्यासंदर्भात संस्थाप्रमुखांचे निश्चित कारणासह अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

उपरोक्त माहिती प्राचार्य, विभाग प्रमुख व अधिव्याख्याता यांची वेगवेगळया प्रपत्रात द्यावी

# प्रपत्र क

महाराष्ट्र तंत्रनिकेतन, शिक्षक सेवा गट-अ या संवर्गातील शिक्षकीय पदावर कार्यरत असलेल्या अध्यापकांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

संस्था / कार्यालयाचे नाव

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | | | | भरलेल्या पदावर सध्या कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची नावे | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नियमित | न्यायालीयीन हंगामी | कंत्राटी | एकुण | नियमित | न्यायालीयीन हंगामी | कंत्राटी | |

C:\Users\desk4a\Desktop\New DETA\backup\My Documents\nutan\cercular\Lecturer tran circular 2008.doc